# स्त्री मुक्ती शिबीर–कासेगाव

जानेवारी १०–११ तारखेला सांगली जिल्हयातील कासेगाव येथे दोन दिवसांचे स्त्री मुक्ती शिबीर झाले. ग्रामीण भागात स्त्रियांची चळवळ बांधण्याच्या प्रयत्नातील एक भाग म्हणून हे शिबीर घेण्यात आले. आसपासच्या खेड्यांमधून जवळपास दीडशे बायका शिबिराला आल्या होत्या. त्यामध्ये शेतमजूर – गरीब व मध्यम शेतकरी स्त्रिया, दलीत व सवर्ण स्त्रिया, शाळेत जाणाऱ्या मुली, शिक्षिका, ग्रामसेविका सर्वांचाच समावेश होता. धुळे जिल्हयातील श्रमिक संघटनेतील आदिवासी शेतमजूर स्त्रिया, निपाणीच्या विडी कामगार स्त्रिया, पुण्यातील सफाई कामगार, कोल्हापूरमधील झोपडपट्टीतील स्त्रिया याचबरोबर वेगवेगळी डावी राजकीय विचारसरणी मानणाऱ्या मध्यमवर्गीय स्त्रीकार्यकर्त्याही आल्या होत्या. 'स्त्री–मुक्ती महिला मंडळ कासेगाव' यांनी हे शिबीर आयोजित केले होते.

कासेगाव हे साखर आणि नगदी पिकांवर आधारित शेतीचे पश्चिम महाराष्ट्रातील एक केंद्र आहे. या भागाला स्वातंत्र्य चळवळीची, जातपात विरोधी आंदोलनाची पूर्वीची एक लढाऊ परंपरा आहे. पण स्वातंत्र्यानंतर मात्र श्रीमंत शेतकरी आणि साखर सम्राटांनी या भागात आपले वर्चस्व प्रस्थापित केलेले आहे. जमिनीवरील त्यांचा ताबा, तसेच सहकारी साखर कारखाने, शिक्षण संस्था, सहकारी पतपेढ्या इ. मार्फत ते आपले वर्चस्व गाजवत असतात. बिहार आणि तेलंगणासारख्या भागातील पाशवी आणि सरंजामी परंपरेच्या तुलनेत हे आर्थिक उदारमतवादी आणि उच्चभ्रू वाटतात इतकेच.

अर्थात स्त्रियांच्या दृष्टीने यामुळे काहीच फरक पडलेला नाही. बहुसंख्य स्त्रिया अजूनही गरीब शेतकरी, शेतमजूरच आहेत. दिवसभर त्यांना शेतात खपावे लागते. गेल्या पन्नास वर्षात थोडाफार बदल झालेला असला तरी अजूनही त्या हिंदू कुटुंबव्यवस्थेच्या परंपरेतच जखडलेल्या आहेत. शिक्षणाचे प्रमाण थोडे वाढलेले असले तरी आजही त्या नवऱ्याच्या हुकमतीखालीच आहेत. इतर अनेक ठिकाणी जसे घडते तसेच अन्याय-अत्याचार येथेही त्यांच्यावर होतच आहेत.

मागच्या महिन्यातच खुद्द कासेगावामध्येच एक बाई व तिच्या ९ वर्षांच्या मुलीवर बलत्कार झाला. दारू पिऊन एकाने आपल्या बायकोच्या अंगावर रॉकेल ओतून तिला पेटवून दिली, जवळच्याच कापूसखेड गावात भटक्या लमाण जातीतील मुलींवर बलात्कार करून त्यांच्या घराला आग लावण्यात आली.

अशा प्रकारच्या अत्याचारांविरुद्ध लढा देण्यासाठी स्त्रियांची संघटित ताकद बांधणे, शेतमजुरांसाठी किमान वेतनाची मागणी करणे, गेल्या दहा वर्षांत भयंकर मोठ्या प्रमाणात वाढत असलेला हुंडा पद्धतीला विरोध ही या शिबिराची प्रमुख उद्दिष्टे होती. या दोन दिवसात स्वसंरक्षणाची प्रात्यक्षिके, लोक विज्ञान चळवळीतील स्त्रियांनी तयार केलेले स्त्री व तिचे शरीर या विषयावरील प्रदर्शन दाखविण्यात आले. स्त्रियांच्या शोषणाचे मूळ काय या बद्दल तसेच भारतातील स्वातंत्र्य पूर्व काळातील व त्यानंतरची स्त्रियांच्या चळवळीबद्दल माहिती देणारी भाषणे व गटवार चर्चा झाल्या.

शिबिराच्या पहिल्या दिवशी रात्री सांस्कृतिक कार्यक्रम झाला. त्यावेळी एक छोटा चित्रपट दाखवला. कासेगाव जवळच्याच एका खेड्यात जन्मलेले सुप्रसिद्ध दलित कवी अण्णाभाऊ साठे यांची गाणी म्हटली. शेवटच्या दिवशी रात्री जवळजवळ अडीचशे स्त्रियांचा मोर्चा निघाला. स्त्रियांवरील अन्यायाला, अत्याचाराला जबाबदार असणाऱ्या लोकांच्या घरावरून त्वेषाने घोषणा देत हा मोर्चा पुढे निघाला होता. शेवटी मोर्चाचे रूपांतर जाहीर सभेत झाले. सभेतील स्त्रियांचा उत्साह प्रचंड होता. जवळ जवळ २,००० स्त्रिया सभेला हजर होत्या. कष्टकऱ्यांच्या क्रांतिकारी वर्ग लढ्याचशी नाते जोडतच स्त्री–मुक्ती चळवळ बांधली पाहिजे यावर सर्व भाषणामधून भर देण्यात आला.

'स्त्रियांची मुक्ती हीच कष्टकऱ्यांची शक्ती' अशा प्रकारच्या जोरदार घोषणांनी सभा संपली.

**–गेल ओमवेट**
कासेगाव

## 'गुलामगिरीचा पुरस्कार करणारी हुंडाप्रथा स्त्रियांनीच प्रयत्नपूर्वक संपवावी '

## मूर्तिजापूर येथील हुंडाविरोधी संमेलनात उमटलेले सूर

दिनांक २५ आणि २६ ऑक्टोबरला मूर्तिजापूर येथे विदर्भ पातळीवर, हुंडाविरोधी संमेलन आयोजित करण्यात आले संमेलनाचे उद्घाटनप्रसंगी डॉ. सीमा साखरे ह्या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. उद्घाटनप्रसंगी बोलतांना डॉ. सीमा साखरे म्हणाल्या की, 'स्त्रीधन' ह्या गोंडस नावाने सुरू झालेल्या हुंड्याच्या पूर्वापार प्रथेने युवतीचे जीवन आज विस्कळीत करून टाकले आहे. विवाहाला बाजाराचे स्वरूप आणले आहे. गुलामगिरीची आणि स्त्रियांच्या शोषणाची प्रतिक असलेली ही प्रथा स्त्रियांनीच प्रयत्नपूर्वक बंद करावी.'

शिबिरासाठी उपस्थित असलेल्या डॉ. सीमा साखरे, डॉ. कुळकर्णी, श्री श्याम मानव आणि प्रा. श्रीकांत तिडके याच्या संयोजनाखाली हुंड्यासंबंधी विविध विषयांवर दुपारी गटचर्चा आयोजित करण्यात आली. या सर्व चर्चेतून, 'हुंडाप्रथा टिकवून ठेवण्यासाठी पुरुष प्रधान संस्कृती बरोबर युवतींची दुबळी मानसिकताही जबाबदार आहे' असाच सूर निघाला. 'मुली सतत स्वतःच्या विवाहाबद्दल चिंतीत असतात, त्यांचे शिक्षण कला, व्यवसाय सर्वांचा एकच उद्देश असतो आणि तो म्हणजे चांगला नवरा मिळविणे. मुलीचे पालक आणि मुली यांची ही मानसिकता ओळखून आजचे युवक या परिस्थितीचा गैरफायदा घेतात. त्यांना तर हुंड घेताना शरम वाटतच नाही, पण हुंड्यासाठी अडवणूक करून आपल्या पालकाला दुःखी करणाऱ्या नवऱ्याबरोबर हसत खिदळत जाहीररीत्या फिरताना अशा मुलींनाही लाज वाटत नाही, म्हणून ही हुंडाप्रथा आजही टिकून आहे' अशा विचारांकडे नेणारी चर्चा फार सजीव आणि प्रसंगी आक्रमक होती.

या अधिवेशनाची वैचारिक बाजू म्हणून दिनांक २६ ऑक्टोबरला 'आजच्या विवाहपद्धतीत युवक-युवतींचे स्थान' या विषयावर परिसंवाद झाला. प्रारंभी डॉ कुलकर्णी म्हणाल्या की, 'स्त्रीच्या गुलामगिरीचा पुरस्कार करणारी ही रुढी नष्ट व्हावी म्हणून आम्ही एक आघाडी उघडली आहे. हुंडा घेणाऱ्यांचा व देणाऱ्यांचा निषेध व्हावा म्हणून आम्ही विवाहमंडपासमोर निदर्शने करतो.' 'आंतरजातीय विवाह आणि विवाहाचे स्वरूप' या विषयावर बोलतांना डॉ. सीमा साखरे म्हणाल्या 'सारे जग अंतर कमी करून, जवळजवळ येण्याच्या प्रयत्नात असताना, जातीपातींच्या कल्पनांच्या आधारावर, आपण विवाहातील वधूवरांच्या निवडीचे क्षेत्र मर्यादित करतो. वर संशोधनामध्ये एकाऐवजी दहा पर्याय मिळू शकले तर हुंड्याला आळा बसेल.' प्रा श्रीकांत तिडके म्हणाले की, 'हुंड्याच्या व्यापारामध्ये विवाहात मुला-मुलींच्या आवडीनिवडींना काहीही स्थान नसते. केवळ दहा मिनिटांच्या प्रश्नोत्तरांच्या सहाय्याने आमच्याकडे आयुष्याचे साथी निवडले जातात. सारं काही पालकच ठरवितात आणि युवक-युवती मुकाट्याने हे विवाह स्वीकारतात.' हुंड्याच्या प्रथेबाबत युवतींना जागे करण्यासाठी हेतूपुरस्सर आरोप-प्रत्यारोप करून, या प्रथेतील पुरुषांचे वर्चस्व, गुलामगिरी, मानसिकता, रुढीप्रियता यांवर हल्ला चढविणारे श्री. श्याम मानव या परिसंवादाला वैचारिक दिशा देण्याचा प्रयत्न करीत होते.

या शिबिरात सुमारे पंचावन्न शिबिरार्थी दोनही दिवस जवळजवळ दिवसाचे चोवीसही तास हुंड्याच्या दुष्परिणामाच्या चर्चेमध्ये गुंतलेले दिसत होते. दिनांक २६ ला रात्री 'घोड्याला फुटलीत शिंगे' ह्या हुंडाविरोधी नाटकाचा प्रयोगही भरगच्च प्रेक्षकांसमोर सादर करण्यात आला.

डॉ. सीमा साखरे